# निकृष्ट सिमेंट कंपनीच्या बॅगमध्ये भरून विक्रीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती,



शहरापासून जवळच असलेल्या मासोद येथील एका गोदामात कालबाह्य झालेले सिमेंट नामांकित कंपनीच्या बॅगमध्ये भरून सर्वसामान्य ग्राहक व इतर कामांसाठी शहर व परिसरात विकण्यात येत होते. मासोद भागातील या कारखाना वजा गोदामावर गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने धाड टाकून हा गोरखधंदा उघड केला. यासह बडनेरालगतच्या काटआमला व नवसारी भागातील गोदामावरही पोलिसांनी एकाचवेळी छापेमारी करून एकूण १२०० बॅग निकृष्ट सिमेंट जप्त केले आहे.

मासोद परिसरात असलेल्या गोदामात मागील चार ते पाच महिन्यांपासून हा गोरखधंदा सुरू होता. गुन्हे शाखेचे पीआय गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, एपीआय इम्रान नाईकवाडे यांनी पथकासह या गोदामावर धाड टाकली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात सिमेंटच्या बॅग या गोदामात भरलेल्या होत्या. हे गोदाम शाहरुख हसनेवाले आणि अफझल कालीवाले या दोघांचे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शहरात व आजूबाजूला काही नामांकित कंपन्यांचे सिमेंट गोदाम आहे. या गोदामात कालबाह्य झालेले, पाणी किंवा ओलाव्यामुळे दगड बनलेल्या सिमेंटच्या बॅग मोठ्या प्रमाणात असतात. या बॅग हे दोघे १०० रुपये किंवा त्यापेक्षाही कमी दराने खरेदी करायचे. या निकृष्ट दर्जाच्या सिमेंटला नामांकित कंपनीच्या रिकाम्या बॅगमध्ये रिपॅकिंग करायचे, त्यामध्ये दगड झालेले सिमेंट असल्यास ते बारीक करायचे, मशीनद्वारे गाळून पुन्हा पॅकिंग करायचे. या नवीन बॅगमध्ये भरलेल्या सिमेंटची २५० रुपये बॅगप्रमाणे होलसेलमध्ये विक्री करायची.

त्यानंतर हे निकृष्ट सिमेंटही नामांकित कंपनीच्या सिमेंटप्रमाणे बाजारात ३०० ते ३५० रुपये प्रतिबॅग दराने विक्री करण्याचा हा गोरखधंदा शहरात सुरू होता. पोलिसांना मासोद येथील गोदामातून जवळपास ७०० बॅग निकृष्ट दर्जाचे सिमेंट जप्त केले आहे.

## देशी दारू दुकानाविरोधात शिवसेना, काँग्रेस आक्रमक

### नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी आमरण उपोषण



**महागाव :** महागाव शहरातील नव्याने सुरू होणाऱ्या देशी दारू दुकानाला मुख्याधिकाऱ्यांनी दिलेली एनओसी रद्द करण्याच्या मागणीसाठी सत्ताधारी काँग्रेस, शिवसेना नगरसेवकांनी आमरण उपोषण आंदोलनाला सुरुवात केली आहे. महागाव शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळ देशी दारू दुकान थाटण्यासाठी महागाव नगर पंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी महेशकुमार जामनोर यांनी कोणतीही सभा, ठराव न घेता किंवा कोणत्याही पदाधिकाऱ्याला विश्वस्त न घेता, पूर्वकल्पना न देता काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरले. तसेच संबंधित दारू दुकानदाराशी आर्थिक तडजोड करून नाहरकत प्रमाणपत्र दिले. परंतु ही बाब जेव्हा नगरसेवकांना समजली, तेव्हा त्यांनी याप्रकरणाची शहानिशा केल्याने मुख्याधिकाऱ्यांचा हा पराक्रम समोला आला. एनओसी रद्द करण्यासाठी सत्ताधारी काँग्रेस व शिवसेना (उबाठा) नगरसेवक, विरोधी नगरसेवकांनी एकत्र येत विशेष सभा बोलावून त्यामध्ये ठराव घेण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे ही एनओसी रद्द करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली होती . परंतु त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने महागाव नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सुनंदा सुरोशे, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, नगरसेवक संभाजीराव नरवाडे, काँग्रेस गटनेते शैलेश सुरोशे, नगरसेवक सुजितसिंह ठाकुर, महेश पाटील, माजी नगराध्यक्ष, नगरसेविका करुणा शिरबिरे, सुरेखा सुरोशे, रुपाली संतोष, कोल्हेकर आदींनी उपोषण सुरू केले आहे.

## शेतकरी एकत्र येत नाही तोपर्यंत विकास नाहीच : राहुल चव्हाण

■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव,

: सध्याच्या बदलत्या हवामान, खर्चिक उत्पादन आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे शेती व्यवसाय संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर न राहता सामूहिकतेकडे वळणे अत्यंत आवश्यक आहे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामग्रीचा योग्य वापर आणि फळिपकांची लागवड हीच शाश्वत शेतीची दिशा आहे, असे मत कृषी अभियांत्रिकी यवतमाळ येथील विषय तज्ज्ञ राहुल चव्हाण यांनी व्यक्त केले. बेंबळा पाटबंधारे विभाग व ज्ञानसाधना शिक्षण संस्था यवतमाळ यांचे संयुक्त उपक्रमाअंतर्गत पाणी वापर संस्थेच्या पदाधिकारी, लाभार्थी यांची वार्षिक आढावा सभा आणि एक दिवसीय कार्यशाळा मार्डी येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तेजस चिमोटे उपविभागीय अधिकारी, बेंबळा विभाग, उद्घाटक मनीष भानवे सचिव बेंबळा विभाग, प्रमुख पाहुणे म्हणून रामटेके वैद्यकीय अधिकारी मार्डी, सुधीर जवादे, डिमन टोंगे, दत्तात्रय खीरटकर, वाल्मीक गाडगे, तसेच बेंबळा पाटबंधारे विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना राहुल चव्हाण म्हणाले की, पडणाऱ्या पावसाचे योग्य नियोजन झाले तरच ओलिताची क्षमता वाढेल. सध्या महाराष्ट्रामध्ये ४० ते ४४ टक्के शेती ओलीताखाली आहे. तर कोणत्या सिंचन पद्धतीमध्ये कोणती पिके घ्यावी याचीही त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन मनोज पवार यांनी केले. प्रास्ताविक मनीष भानवे यांनी केले. तर आभार भाऊराव मेघावत यांनी मानले. कार्यक्रमाला पाणी वापर संस्थेचे सर्व सभासद आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिया नाकाडे, प्रतीक लालसरे, लालसरे, बुचुंडे, स्नेहा कावडे, शिवानी वगारे, परमेश्वर आडे, अनिकेत जोगदंड, सारंग चव्हाण सहकार्य केले.

## रस्ते करा, अन्यथा स्वातंत्र्यदिनी चक्काजाम आजाद समाज पक्षाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड ,



महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अंतर्गत सुमारे २५४ कोटी रुपये खर्चून बनवण्यात येणाऱ्या हरदडा फाटा ते पुसद या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाल्यामुळे रस्त्यात मोठमोठे खड्डे तयार होऊन अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने हरदळा फाटा ते विडूळमार्गे या रस्त्याच्या दुरुस्तीस तत्काळ सुरुवात करण्यात यावी, अन्यथा येत्या स्वातंत्र्यदिनी दि. १५ ऑगस्ट रोजी चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा आझाद समाज पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्यामार्फत अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांना निवेदनाद्वारे देण्यात आला. हरदडा फाटा ते विडुळ मार्गे उमरखेड या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी असते. याच रस्त्याने रेल्वे मार्गाने प्रवास करण्याकरिता हिमायतनगरकडे जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. तसेच ढाणकी मार्गे माहूर जाणाऱ्या भाविकांची सुद्धा मोठ्या प्रमाणात या रस्त्याने वरदळ असते. तालुक्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या बंदी भागातील नागरिक दररोज तहसीलच्या इतर शासकीय कार्यालयात कामानिमित्त येत असतात. त्याचप्रमाणे बंदी भागातून शिक्षण घेण्याकरिता शेकडो विद्यार्थी याच मार्गे ये जा करतात, परंतु नादुरुस्त आणि खड्डेमय रस्त्यामुळे प्रचंड त्रास प्रवाशांना सहन करावा लागत असल्यामुळे नागरिकात प्रचंड रोष व्यक्त केल्या जात आहे. हरदडा ते पुसद या रस्त्याची महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत २५४ कोटी रुपये खर्चून रस्त्याची दुरुस्ती होणार आहे.

यावेळी आजाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ऊर्फ जॉन्टी विणकरे, जिल्हा महासचिव संतोष जोगदंडे, तालुकाध्यक्ष देवानंद पाईकराव, जिल्हा उपाध्यक्ष आशिष खडसे, तालुका महासचिव सचिन वाहुळे, राहुल धुळधुळे, गौतम कांबळे, समाधान राऊत, आबा गायकवाड, शब्बीर भाई, यांनी दिला आहे.

## सभापतीपदी वंचितचे भोंगे, उपाध्यक्षपदी शेतकरी पॅनलचे वाघ

# तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये वंचितची सरशी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला,



तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, उपसभापती पदासाठी गुरुवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे श्याम भोंगे यांची सभापती पदी तर उपाध्यक्ष पदी शेतकरी पॅनलचे हरिदास वाघ विजयी झाले.

या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व धनगर समाज संघटनेचे पदाधिकारी श्याम भोंगे यांची तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती म्हणून बिनविरोध निवड झाली तर उपसभापती म्हणून शेतकरी पॅनलचे हरिदास वाघ यांची बिनविरोध निवड झाली. संपूर्ण विदर्भात सहकार क्षेत्रात धनगर समाजाला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती म्हणून वंचितने संधी दिली, हे पक्षाचे प्रमुख ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती करून धनगर समाजाला सहकार क्षेत्रामध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली, अशी प्रतिक्रिया वंचितचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांनी दिली. या निवडीने जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये व धनगर समाजामध्ये आनंदाचे वातावरण आहे. सभापती म्हणून निवड झाल्यानंतर श्याम भोंगे यांचे जंगी स्वागत करून तेल्हारामध्ये मिरवणूक काढण्यात आली. या वेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते. तर तालुकाध्यक्ष अशोक दारोकार, माजी सभापती सुनील इंगळे, संचालक मोहन पात्रीकर, गोपाल कोल्हे, श्रीकृष्ण जुमडे, सुमित गवारगुरु, संदीप गवई, श्रीकृष्ण वैतकार, मधुसूदन बरिंगे, रतन दांडगे, इद्रिस भाई आदी उपस्थित होते.

## भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँकेकडून हजार झाडांचे रोपण

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड ,



उमरखेड पर्यावरण संवर्धन आणि हरित भविष्यासाठी भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँक या अभिनव उपक्रमाअंतर्गत ५ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने या उपक्रमाचा दुसरा टप्पा उमरखेड, विडूळ, हरदडा येथे राबवण्यात आला. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते हरदडा येथे वृक्ष लागवड करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय माने, विडूळच्या सरपंच वंदना कोत्तेवार, जगदीश धुळे, पंजाबराव भालेराव, पोलिस पाटील गजानन मुलंगे, प्रयाग कोत्तेवार, माजी बालकल्याण सभापती छाया धुळध्वज, विकास मुलंगे, प्रकाश नागरपवाड, अशोक धुळे, कमल हिंगमिरे, कैलासराव आगलावे, डॉ. शिवचरण हिंगमिरे, दतराव मार्लेगावकर, सुनंदा जाधव, उत्तमराव बोन्सले, गोपाल इंगोले आदी उपस्थित होते.

या उपक्रमात जिल्हा परिषद मुलांची शाळा विडुळ, तेजमल गांधी कृषी विद्यालय, भाऊसाहेब माने कृषी तंत्र विद्यालय, ब्राह्मणगाव या तिन्ही शाळेच्या व कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून ही वृक्ष लागवड करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद मुलांची शाळा, शाळा समिती अध्यक्ष अजय धुळे व मुख्याध्यापक साहेबराव माने यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

या कार्बन क्रेडिट बँकेत कर्ज ही ठेव असून या ठेवीच्या बदल्यात इंटरेस्ट म्हणून सर्वांना प्राण वायू मिळतो, वृक्ष हे क्षणात एका सिओटू रेणूपासून एक कार्बन अणू झाडात डिपॉजिट करतात. त्या बदल्यात सर्व सजीवांना दुप्पट ऑक्सिजन देणारी ही जगातली पहिली नैसर्गिक बँक आहे, असे मत डॉ. विजय माने यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन सुनील वानखेडे, प्रास्ताविक साहेबराव माने तर आभार माधव काळबांडे यांनी मानले.

# कंत्राटदारांची देयके अदा करा युकाँची निदर्शने

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती,



कंत्राटदारांची थकीत देयके तातडीने देण्याच्या मागणीसाठी युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. कंत्राटदारांची देयके अडल्यामुळे त्यांना नाईलाजाने अनेक ठिकाणची लोकोपयोगी कामे थांबवावी लागली. परिणामी ग्रामीण आणि शहरी भागाचा विकासही थांबला आहे. त्यामुळे त्यांची देयके तातडीने देण्याची मागणी युवक काँग्रेसने केली आहे. युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ, वैभव देशमुख आदींनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

ज्या कंत्राटदारांनी सरकारी विभागाची कामे प्रामाणिकपणे पूर्ण केली ते कित्येक महिन्यांपासून थकीत बिलांच्या प्रतीक्षेत आहेत. काहींनी बँकांकडून कर्ज घेतले आहे, काहींनी घरे गहाण ठेवली आहेत, अनेकजण कर्जबाजारी झालेत. हे सरकारच्या व प्रशासकीय यंत्रणेच्या निष्क्रियतेचे व हलगर्जीपणाचे धक्कादायक उदाहरण आहे. विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर केवळ २० हजार कोटी हाती असताना तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी ६४ हजार कोटींची कामे त्यांच्याकडून करून घेत वेळ मारून नेली. राज्यभर या कामांचे धडाकेबाज भूमिपूजन पार पडले. आता मात्र शासनाकडे निधी नसल्याच्या कारणावरून या सर्व कंत्राटदारांची देयके अडवून ठेवली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तब्बल ४६ हजार कोटींची देयके थकीत असून त्यामध्ये सामान्य कंत्राटदार भरडले जात आहेत. हा त्यांच्या जीवनाशी शासनाने खेळ सुरू केल्याची आंदोलकांनी म्हटले आहे.

तसेच सांगली येथे आत्महत्या करणारे तरुण कंत्राटदार हर्षल पाटील यांच्या आत्महत्येची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, देयके अदा करण्यासाठी निश्चित कालमर्यादा असलेली पारदर्शक कार्यपद्धती लागू करावी, राज्यातील कंत्राटदारांची सुरक्षितता, भविष्य अबाधित राहण्यासाठी शासनाने दीर्घकालीन धोरणात्मक निर्णय घ्यावेत आदी मागण्याही केल्या. आंदोलनात अनिकेत ढेंगळे, सागर कलाने, आशिष यादव, अक्षय साबळे, संकेत साहू, आकाश गेडाम, शुभम बांबल, वेदांत केने, अमेय देशमुख, कुणाल गावंडे, धनंजय बोबडे, निशांत देशमुख, हर्षल रोंघे, केदार भेंडे, हर्षल साखरकर, व्यंकटेश मेटकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## आश्रम शाळा फुलवाडी येथील नऊ कुस्तीपटूंची जिल्हास्तरावर निवड

**पुसद :** ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक मंडळ फुलवाडीद्वारा संचालित स्व.आप्पासाहेब अत्रे विजाभज आश्रम शाळा फुलवाडी येथील नऊ कुस्तीपटूंची जिल्हास्तराकरिता निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, तालुका शारीरिक शिक्षक संघटना, अप्पासाहेब अत्रे विजाभज आश्रम शाळा फुलवाडी, तसेच जय बजरंगबली व्यायाम शाळा फुलवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धांचे आयोजन फुलवाडी येथे करण्यात आले होते.

## विविध मागण्यांसाठी आदिवासी बांधवांचे आंदोलन

### तहसील कार्यालयातर्फे आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन

**पुसद :** विशेष पदभरती प्रकरणी हिंगोली येथील उपोषणाला पुसद तालुक्यातील आदिवासी कृती समितीसह विविध आदिवासी संघटनेच्यावतीने जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. आदिवासींच्या विविध मागण्यासाठी पुसदच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये तब्बल अर्धा शांततेच्या मार्गाने तास रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार राठोड यांना आदिवासी समाजातर्फे निवेदन दिल्या दिले होते. सदरचे निवेदन महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास मंत्र्यांना सुपूर्द करण्यात येणार आहे. सध्या स्थितीत राज्यातील हजारो आदिवासी विद्यार्थी, युवक व पालक हिंगोली येथे सुरू असलेल्या विशेष भरती व रिक्त जागा भरण्यासाठी उपोषणात सहभागी झाले आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव १२ हजार ५२० पदे आणि एकूण ८५ हजार रिक्त जागेवर भरती प्रक्रिया रखडल्यामुळे आदिवासी समाजामध्ये तीव्र असे असंतोष निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर पुसद तालुक्यातील आदिवासी कृती समिती पुसद आणि विविध आदिवासी संघटनेच्यावतीने शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी रास्ता रोको आंदोलन केले होते.

## विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिबळाच्या माध्यमातून वाढणार निर्णयक्षमता

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती,

: अमरावती महानगरपालिकेच्या पुढाकाराने आणि आयुक्त सौम्‍या शर्मा चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत दोन महत्त्वपूर्ण शालेय उपक्रमांसाठी सामंजस्य करार स्वाक्षरी समारंभाचे आयोजन महानगरपालिका मुख्यालयात करण्यात आले. हे दोन्ही उपक्रम फक्त अमरावती महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी राबवले जाणार आहेत. 'प्रकल्प चेस गुरुकुल' हा स्वतंत्र बौद्धिक विकास उपक्रम असून, शालेय विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिबळाच्या माध्यमातून विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि संयम वाढवण्याच्या उद्देशाने राबविला जाणार आहे. तसेच माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत राबवण्यात येणारा 'प्रकल्प निसर्गदूत' हा उपक्रम पर्यावरण संवर्धन, शाश्वत जीवनशैली आणि विद्यार्थ्यांमध्ये हरित जागरूकता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. 'प्रकल्प निसर्गदूत' अंतर्गत महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध पर्यावरण कार्यशाळा, वृक्षारोपण मोहीम, कचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन आणि हवामान बदलासंबंधी उपक्रम राबवले जातील. याचा उद्देश मुलांमध्ये पर्यावरणविषयक समज आणि जबाबदारी निर्माण करणे आहे. 'प्रकल्प चेस गुरुकुल' अंतर्गत सर्व पालिकाशाळांमध्ये बुद्धिबळ प्रशिक्षण सत्रे, मार्गदर्शन शिबिरे, स्पर्धांचे आयोजन केले जाईल.

## मुलांच्या संरक्षणासाठी पथनाट्याद्वारे जनजागृती



**अकोला :** अकोला मानव तस्करी विरोधी दिनानिमित्त मुलांच्या संरक्षण करण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात आला. रेल्वे स्थानक परिसरात पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. सांघिक प्रयत्नांतून बाल तस्करी रोखता येईल, असेही मत व्यक्त करण्यात आले. जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, रेल्वे विभाग आणि ॲसेस टू जस्टीस प्रकल्पातर्फे रेल्वे स्थानक परिसरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपक्रमात जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, बालकल्याण समिती, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण जिल्हा परिषद, रेल्वे विभाग, रेल्वे सुरक्षा बल, रेल्वे पोलिस स्टेशन, जिल्हा बाल संरक्षण कक्ष , चाइल्ड लाईन सिटी व रेल्वे आणि ॲसेस टू जस्टीस प्रकल्पाचे प्रतिनिधी सहभागी झाले. कार्यक्रमाचे प्रास्तविक जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडूलकर यांनी केले. कार्यक्रमाला महिला बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजश्री कौलखेडे , बाल कल्याण समिती सदस्य राजेश देशमुख, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीनिवास पाटील , रेल्वे स्टेशन प्रबंधक अधिकारी संतोष कवडे, रेल्वे सुरक्षा बलाचे लक्ष्मण यादव, रेल्वे पोलीस स्टेशन चे देवराम ढगे यांच्यासह अन्य होते.

## जिल्हा बँकेचे संचालक आनंद काळे यांच्या विरोधात कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती,




अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आनंद काळे यांच्या संचालकपदाच्या वादावर आता ६ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ क (अ) नुसार हे प्रकरण चालवले जात आहे. बँकेच्या बारा संचालकांनी काळे यांच्याविरुद्ध विभागीय सहनिबंधक यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्यावर बँकेच्या हिताविरुद्ध काम करण्याचा आरोप आहे. या तक्रारीनुसार विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांनी काळे यांना संचालकत्व रद्द का करू नये, अशी नोटीस बजावली होती.

२९ जुलै रोजी सुनावणी ठरली होती. परंतु काळे यांनी वेळ मागितल्याने न्यायालयाने एक आठवड्याचा अवधी वाढवून दिला. प्रारंभी या प्रकरणात १४ जुलैपर्यंत स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. परंतु काळे यांनी नोटीसच मिळाली नाही असा युक्तिवाद करत स्पष्टीकरण सादर केले नव्हते.

हरिभाऊ मोहोड यांच्यासह जिल्हा बँकेच्या बारा संचालकांनी २१ एप्रिल २०२५ रोजी काळे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत म्हटले आहे की काळे पदावर आरूढ झाल्यापासून बँकेच्या हिताविरुद्ध मनमर्जीने काम करत आहेत. नियमाशी तडजोड करून ते अपहार करत असल्याचेही नमूद आहे.

कलम ७८ अ नुसार त्यांनी केलेल्या खर्चाचा बोध होत नसल्याने त्यांना अपात्र घोषित करण्याची मागणी आहे. न्यायालयात दाखल केलेल्या एका प्रकरणी नेमण्यात आलेल्या वकिलाची फी बँकेच्या खात्यातून नियमबाह्य देण्यात आली, असाही आरोप त्यांच्यावर आहे.

विभागीय सहनिबंधक यांनी आनंद काळे यांना संचालक पदावरून निष्कासित का करू नये, अशी नोटीस बजावली आहे. आगामी ६ ऑगस्टच्या सुनावणीकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

# पोलिस प्रशासनाकडून हेल्मेट वापरण्यासाठी जनजागृती मोहिम

■ महासागर प्रतिनिधी, पुसद,

: शहरामध्ये दिवसेंदिवस अपघाताच्या घटना घडत आहेत. अपघाताला कारणीभूत ठरणारे कारण म्हणजे दुचाकी चालक हेल्मेट वापरण्यास टाळाटाळ करतात. दुचाकी स्वरांनी हेल्मेट वापरावे या जनजागृतीसाठी उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बीजे यांनी २० हेल्मेट मोफत वाटप केले होते.



ज्यांनी हेल्मेट घातलेले नव्हते अशा दुचाकीस्वारांना गुलाबाचे फुल देऊन हेल्मेट वापरण्यासाठी प्रोत्साहित केले होते. हा जनजागृतीचा कार्यक्रम येथील नाईक चौकामध्ये घेण्यात आला होता. दुचाकी चालवताना हेल्मेट वापरावा असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने त्यावेळेस करण्यात आले होते. पुसद शहरामध्ये गेल्या काही महिन्यापासून ५० जणांनी अपघातात जीव गमवला होता. त्याचे मुख्य कारण म्हणजे हेल्मेट न वापरणे. हेल्मेट वापरा आणि जीव वाचवा असा संदेश देत उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बीजे यांच्या नेतृत्वामध्ये दि. ३० जुलै २०२५ रोजीच्या संध्याकाळी ५ वाजताच्या दरम्यान येथील नाईक चौकामध्ये पोलिस विभागाचे अधिकारी तसेच वाहतूक उपशाखाचे पोलिस निरीक्षक निलेश शेंबडे यांच्या उपस्थितीत हेल्मेट न वापरणाऱ्यांना २० हेल्मेट मोफत वाटप केले होते. याशिवाय ज्यांनी हेल्मेट घातले नव्हते अशा दुचाकीस्वारांना लाल गुलाब देऊन त्यांना हेल्मेट वापरण्यासाठी प्रोत्साहित केले होते. पोलिसांच्या या उपक्रमामुळे शहरांमध्ये कौतुक होत आहे.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | EM-I / Rfx No. 3000060599 (Refloated) / Work of Overhauling of 6.6 KV HT Boards & HT circuit breakers of Unit-4, 210MW at CSTPS, Chandrapur / Rs.740001/- |
| 2 | TM-I / Rfx No. 3000060498 (Refloated) / Work of spray insulation of turbine during Unit-4 AOH, CSTPS, Chandrapur / Rs.732767/- |
| 3 | BM-I / Rfx No. 3000060499 (Refloated) / Repairing and reconditioning work of IGV set for ID fan model AN25e6 in AHP-210 MW during U-4 AOH, on as and when required basis at CSTPS, Chandrapur / Rs.2640000/- |
| 4 | BM-I / Rfx No. 3000060501 (Refloated) / Work of In-Situ repair / servicing of H.P. valves in BHEL boiler of U-4 during AOH at CSTPS, Chandrapur / Rs.2067881.79/- |
| 5 | BM-I / Rfx No. 3000060620 (Refloated) / Work of design manufacturing, supply & erection of cold air dampers spare for U-4 AOH at CSTPS, Chandrapur / Rs.2300800/- |
| 6 | TECH / Rfx No. 3000060617 / Work contract for engaging round the clock vechicles (Bolero/Scorpio or Equivalent) for patrolling of special task force security from Bhatadi (Loading point) to Padmapur (Discharge Terminal) Padmapur Bhatadi pipe conveyor belt area at CSTPS, Chandrapur (Stop gap arrangement thereof) / Rs. 1427108/- |
| 7 | CIVIL / Rfx No. 3000060511 / Repairing of existing drain well along with cleaning, providing Filter media, core cutting in existing drain well of ash bund at CSTPS, Chandrapur / Rs.3595395/- |
| 8 | TEST-II / Rfx No. 3000060616 (Refloated) / Work contract for Testing of Generator & Switchgear Protection relays of Unit-5 during Unit Overhaul period / Rs.1657000/- |
| 9 | TEST-II / Rfx No. 3000060618 (Refloated) / Work of testing of Power Transformers of Unit-5 during overhaul period / Rs.445120/- |
| 10 | BM-I / Rfx No. 3000060628 / Work of servicing/repairing of Oil Gun & Burner tilt assemblies in U-3&4 boiler during shutdown & on as and when required basis / Rs. 1465089.94/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 10)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

